## . नाविण्यपुर्ण उपक्रम – १

# ( **Service Delivery** साठी **Whatsapp** चा वापर )




- लोहमार्ग नागपुर पोलीस दलाचे Helpline Based on Whatsapp या नावाने सुरु असुन नागपुर लोहमार्ग पोलीस दलाकडुन केलेल्या उल्लेखनिय कामगिरीचे तसेच सर्वसामान्य जनतेकरीता जनजागृतीचे काम, घडलेल्या गुन्हयाची माहिती, मनुष्य/वस्तु गहाळ तक्रार/अनोळखी व्यक्ती मृतदेह प्रकरण माहिती, अवैध दारु/अंमली पदार्थ वाहतुक होत असल्यास संबधित माहिती देण्यासाठी.


- तसेच आवश्यकतेनुसार सदर चॅनेलव्दारे तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचा निपटारा तात्काळ करण्याची व FIR ची सदयास्थिती कळविण्याची दक्षता घेत आहोत.

- यासंदर्भात पो.स्टे./रेल्वे स्टेशन परिसर/रेल्वे गाडीत पोस्टर लावुन जनजागृती करण्यात आली.

# नाविण्यपुर्ण उपक्रम—३


## ( GIS चा नाविण्यपूर्ण वापर )

- GIS मॅपिंग सर्व ६ पोलीस स्टेशनचे मॅपिंग, गुन्हयांची संखा,ठिकाणे व चौकयांची माहिती नकाशावर प्रदर्शित करण्यात आलेली आहे
- लोहमार्ग नागपुर पोलीस दलातर्फे Duty Monitoring System नावाने ॲप बनविले आहे.
- कर्मचारी कर्तव्यावर हजर झाल्यावर ॲपमध्ये लॉगीन करतात.
- कर्मचा—याचे करंट लोकेशन या सिस्टीम मध्ये दिसते.
- कर्मचारी त्यांच्या कार्यक्षेत्राबाहेर गेल्यास "Alert " पॉपअप संदेश प्राप्त होतो.
- आणिबाणीच्या काळात कर्मचा—यास संपर्क साधुन त्यांच्या जवळील पिडीतास तातडीची मदत पुरविणे शक्य होते.




## Google Facing

हा ॲडमिनमध्ये असलेला गुगल मॅप आहे. ज्यात संपुर्ण स्टाफची लाईव लोकेशन दिसुन येते. ज्यात निळया रंगाचा डॉट हे इनसाईड फेनसिंग आणि लाल रंगाचे डॉट आऊट साईड फेनसिंग एरिया इंडीकेट करतात.



## रेल्वे स्टेशन नागपुर

या स्क्रिनमध्ये नागपूर रेल्वे स्टेशनला लाल रंगाच्या आवरणनी फेनसिंग केले आहे. त्या लाल रंगाच्या आवरणाच्या आतमधील एरिया म्हणजे डयुटी ईन एरिया आणि ऑऊट साईड एरिया म्हणजे डयुटी ऑऊट




ऑन डयुटी स्टाफ निळया रंगाच्या डॉटनी दिसत असेल तर तो डयुटी एरियाच्या फेसिंगच्या आतमध्ये आहे असा अर्थ होतो.




गुगल मॅपमध्ये ऑन डयुटी असलेले स्टाफ जेव्हा लाल रंगाच्या डॉटनी दिसतात ते म्हणजे ऑन डयुटी असुन डयुटी एरियाच्या फेसिंगच्या बाहेर आहे असा अर्थ होतो.



या स्क्रिनमध्ये जे हिरव्या रंगाच्या फेसिंग मध्ये दिसुन येत आहे. ते म्हणजे रेल्वे ट्रॅक



## पोलीस खात्यात डयुटी मॉनिटरिंग ॲप सुरू झाल्याने पोलीसांना झालेले फायदे

- महाराष्ट्र पोलीस दलामध्ये शिस्त, पारदर्शकता व कार्यक्षमता वाढवण्यासाठी विविध तांत्रिक सुधारणा राबविण्यात येत आहेत.
- डयुटीतील पारदर्शकता वाढली. डयुटी मॉनिटरिंग ॲप मुळे कोणता पोलीस अधिकारी/अंमलदार कोणत्या ठिकाणी, कोणत्या वेळेत डयुटीवर आहे याची अचूक माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना तात्काळ उपलब्ध होते. त्यामुळे खोटी हजेरी, गैरहजेर राहणे किंवा डयुटी टाळणे यास आळा बसला आहे.
- वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नियंत्रण सुलभया ॲपच्या माध्यमातून वरिष्ठ अधिकारी थेट डयुटीचे निरीक्षण करू शकतात. प्रत्यक्ष ठिकाणी नजाता मोबाईल/सिस्टीम वरून डयुटीची स्थिती पाहता येत असल्याने प्रशासन अधिक प्रभावी झाले आहे.
- वेळेची बचत व कागदोपत्री काम करण्यापुर्वी डयुटी रजिस्टर, हजेरी पत्रक, अहवाल यासाठी मोठया प्रमाणात कागदोपत्री काम करावे लागत असे, डयुटी मॉनिटरिंग ॲपमुळे हि सर्व माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध होत असल्याने वेळेची बचत झाली असुन कामाचा ताण कमी झाला आहे.

- जबाबदारी व कर्तव्या भावना वाढली, आपली डयुटी थेट मॉनिटर होत आहे याची जाणीव असल्यामुळे पोलीस अधिकारी/अंमलदार अधिक जबाबदारीने व प्रामाणीकपणे कर्तव्य बजावु लागले आहेत. त्यामुळे एकुणच पोलीस दलाची कार्यक्षमता वाढली आहे.
- तात्काळ अहवाल व पुरावे उपलब्ध कुठल्याही घटणेच्या वेळी संबंधीत डयुटीवर असलेल्या पोलीसांची माहीती वेळ व ठिकाण लगेच उपलब्ध होत असल्याने चौकशी व प्रशासकीय कारवाही सुलभ होते याचा उपयोग विभागीय आढावा अहवाल व न्यायालयीन कामकाजातही होतो.
- नागरिक सेवेत सुधारणाडयुटी नियोजन योग्य प्रकारे होत असल्याने नागरिकांना वेळेवर मदत मिळते. बीट डयुटी, बंदोबस्त, पेट्रोलिंग यामध्ये सातत्य राहिल्यामुळे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अधिक मजबुत झाली आहे.
- **निष्कर्ष**

डयुटी मॅनिटरिंग ॲप हे पोलीस खात्यासाठी एक महत्वाचे तांत्रिक साधन ठरले आहे.त्यामुळे पारदर्शक्ता, शिस्त, जबाबदारी आणि कार्यक्षमता वाढून पोलीस दल अधिक सक्षम झाले आहे. आधुनीक तंत्रज्ञानाचा योग वापर कल्यास पोलीस प्रशासन अधिक लोकाभिमुख व प्रभावी होऊ शकते हे या ॲपमुळे सिध्द झाले आहे.

# नाविण्यपुर्ण उपक्रम २

## ( AI चा नाविण्यपूर्ण वापर )

- मा.पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली Crime Investigation Status bot नावाने व्हॉटस ॲप चॅनेल तयार करण्यात आले असुन त्याचा क्रमांक ९४२०७६१९३४ असा आहे.
- या व्हॉटस ॲप चॅनेलमुळे घडलेल्या गुन्हयासंदर्भातील सदयास्थिती तात्काळ माहिती मिळते.
- गुन्हा दाखल करतेवेळी तक्रारकर्त्यांनी जो मोबाईल कंमाक दिला आहे, त्याच मोबाईल कंमाकाने गुन्हयासंदर्भातील सदयास्थिती तात्काळ मिळते.
- उदा. FIR2024 123456
- **AI चा नाविण्यपूर्ण वापरामुळे वेळेची बचत होते.**

